# आपल्या माहितीला उजाळा - भाग २

महाराष्ट्र पक्षीमित्र संघाच्या त्रैमासिकेचे प्रायोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या ज्ञानभांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे. प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवतील अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकता. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

## आपल्या माहितीला उजाळा प्रश्नावली

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १) | जागतिक वन्यजीव दिन ____ या दिवशी साजरा करतात. | १९२३ मध्ये याच दिवशी 'टाईम' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला |
| २) | राष्ट्रीय पक्षी मोर जीवशास्त्रीय वर्गीकरणातल्या ___ या कुटुंबात गणला जातो. | Pavo cristatus हे त्याचे शास्त्रीय नाव आहे. |
| ३) | कोणत्या समाजमाध्यामाचे चिन्ह पक्षी आहे. | हे माध्यम अमेरिकेने बनवले आहे. |
| ४) | गटात न बसणारा पक्षी ओळखा - कंठवाला होला, छोटा तपकिरी होला पाचू होला, लालपंखी होला ठिपकेवाला होला | गटात न बसणाऱ्या पक्ष्याच्या जातीचे नाव गौल्ड (Gould) याने ठेवले. |
| ५) | डॉ. सालिम अली यांच्या आत्मवृत्ताचे शीर्षक __ हे आहे. | ती १९८५ साली प्रकाशित झाली. |
| ६) | पक्ष्यांची जीवाश्मासंबंधी अभ्यास करणारी ज्ञानशाखा म्हणजे __ | यामध्ये पक्षी प्रजातींच्या उत्क्रांतीचेही अध्ययन करतात. |
| ७) | ___ हा पश्चिम बंगाल राज्याचा राज्यपक्षी आहे. | हा पक्षी मासेमारीसाठी कुशल आहे. |
| ८) | Caprimulgidae या पक्षी कुटुंबात__ यांचा समावेश होतो. | हे पक्षी निशाचर आहेत. |
| ९) | पक्ष्यांच्या स्थलांतराचा भारतातून असणाऱ्या हवाई मार्गाचे नाव काय? | हा मार्ग आशिया खंडातून जातो. |
| १०) | चित्रातील पक्षीशास्त्रज्ञ ओळखा.  | Handbook of the Birds of India and Pakistan या बहुखंड ग्रंथाचे सहलेखक. |

# येरे येरे पावश्या



**लक्ष्मीकांत नेवे**
8149659353/7588740661
lakshmikant.bird@gmail.com



कसे नाव ठेवलेत माझे,
पुन्हा करा बारसे,
ताप होतो डोक्याला,
मंजुळ आवाजाला तरसे ।।

काय आले दिवस
ऊसाळा नि हिवसाळा,
सदाच मी ओरडू का
कमी करा पावसाळा ।।

पेरते व्हा पेरते व्हा
सुरू करता पेरणी,
नंतर मात्र वाटे
माझा आवाज अळणी ।।

नियती माझी अशी
मागतो तुमची माफी,
दिला आवाज कर्कक्ष
पिलांकडे दुर्लक्ष ।।

काय करावे कळत नाही,
जगण्याशिवाय पर्याय नाही,

*****

## 'पक्षिमित्र' पोहोचला संस्कृतमध्ये

'पक्षिमित्र'च्या जानेवारी २०२१ च्या अंकात श्री. लक्ष्मीकांत नेवे यांनी लिहिलेली 'काकथा' प्रसिद्ध झाली होती. ती वाचल्यावर श्री. जयवंत गायकवाड यांनी श्री. नेवे यांची परवानगी घेऊन त्याचा संस्कृतमधील अनुवाद केरळमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'रसना' या नियतकालिकात प्रसिद्ध केला आहे. श्री. नेवे यांचे अभिनंदन.

*****

## आपल्या माहितीला उजाळा ची उत्तरे

१. ३ मार्च    २. फासियानीडी Phasianidae    ३. ट्विटर

४. पाचू होला. पाचू होला हा Chalcophaps या मूळ जातीत गणला जातो, तर इतर पक्षी Streptopelia मध्ये गणले जातात.

५. The Fall of Sparrow    ६. Paleornithology    ७. खंड्या (WhiteBreastedKingfisher)

८. रातवा    ९. Central -sian Flyways    १०. Sidney Dillon Ripley

*****